**प्रेस नोट दिंनाक १५/१०/२०१८**
**हडपसर पोलीस स्टेशन**

हडपसर पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पो.शि.८७३४ विठ्ठल एकनाथ चिपाडे व पो.शि.७४९३ युवराज मधुसुदन कांबळे हे दिंनाक १४/१०/२०१८ रोजी हडपसर पोलीस ठाणे हद्दीतील हडपसर बीट मार्शलवर कर्तव्यास असताना मुख्य नियंत्रण कक्षाकडुन रात्री ११.०० वाजता कॉल प्राप्त झाला की,१५ नंबर हडपसर पुणे येथे एक इसम आत्महत्या करीत आहे. असा कॉल प्राप्त झालेने  पोशि विठठल चिपाडे व युवराज कांबळे यांनी कॉल स्विकारुन १५ नंबर येथे जावुन कॉलर यांचा मोबाईल नंबर मुख्य नियंत्रण कक्षाकडुन प्राप्त करुन सदर कॉलर नामे संकेत खेडेकर यांना फोन केला असता त्यांनी सांगीतले की, भगवंती हाऊसेस येथे एक इसम नामे सुब्बु नायर हा राहते घरामध्ये हॉलमध्ये गळफास घेत आहे. असे सांगीतले व सदर ठिकाणचा पत्ता सांगीतला असता सदर कर्मचारी यांनी  सदर ठिकाणी  जावुन कॉलर संकेत खेडेकर यांचे मदतीने नायर यांचे घराचा दरवाजा आतुन बंद होता. तो अथक प्रयत्न करुन उघडला त्यावेळी त्यांना दिसले की, इसम नामे सुब्बु नायर हा हॉलचे सिलींग फॅनला सुताच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला तेव्हा पोशि विठ्ठल चिपाडे व पो.शि.युवराज कांबळे व संकेत खेडेकर व इतर लोकांचे मदतीने गळफास घेतलेल्या इसमास धरुन उचलुन चाकुचे साह्याचे सदरचा गळफास घेतलेला दोर कापला. त्यास उतरुन बेडवर झोपवले त्याची हाताची नाडी व ह्रदयाचे ठोके ऐकु येत असल्याने त्यास तात्काळ उपचारकामी १०८ अॅब्युलन्सचे साहाय्याने ससुन हॉस्पीटल येथे उपचारकामी त्याचे नातेवाईकांसोबत व कॉलर नामे संकेत खेडेकर यांचेसह पाठवीले. सध्या त्याची प्रकृती व तब्येत सुखरुप आहे.तसेच त्याचेवर ससुन हॉस्पीटल येथे उपचार चालु आहेत.